संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक
mandeshexpressatp@gmail.com
दैनिक माणदेशी बुलंद आवाज..

# माणदेश एक्सप्रेस

संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे
मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६
www.mandeshexpress.com

● वर्ष : ७ वे ● ● अंक : ६९ वा ● ● रविवार दि. ८ ऑक्टोबर २०२३ ● ● किंमत २ रू ● पाने : ४ ● RNI : MAHMAR/2017/77021 Postl Reg : SGL/143/2023-2025

एम एन जाधव (सर) हॉस्पिटल यांचे
श्राव्या डायग्नोस्टिक्स
डिजिटल एक्स-रे सोनोग्राफी सेंटर,आटपाडी
उपलब्ध सुविधा
डॉ.सौ. चैताली सप्तेश जाधव (M.B.B.S. D.M.R.E.)
डॉ. सप्तेश मधुकर जाधव (M.B.B.S.M.S. D.N.B. F.M..S.)
* सर्व प्रकारचे डिजिटल एक्स-रे * गरोदर मातांची सोनोग्राफी 4 D स्कॅन व गर्भातील बाळांचे व्यंग निदान करणे * पोटाची, छातीची, थायराईड व स्तनाची अत्याधुनिक (हाय रिझोल्यूशन) स्कॅन * वंधत्वसाठीची आणि पाळीच्या समस्या बाबतच्या सोनोग्राफी * इंटरव्हेशनल सोनोग्राफी * सोनोग्राफीद्वारे गाठीचा तुकडा तपासणे, छातीतील किंवा पोटातील पाणी. पु काढणे. तसेच लिव्हर मधील गाठीचा (Abcess) सोनोग्राफीद्वारे उपचार
पत्ता : ग्रामीण रुग्णालयासमोर, आटपाडी

## इस्त्रायलवरील रॉकेट हल्ल्यातील मृतांची संख्या ४०

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नवी दिल्ली :** दहशतवादी संघटना हमासने इस्त्रायलवर केलेल्या रॉकेट हल्ल्यातील मृतांची संख्या ४०वर पोहचली आहे, असे वृत्त 'एएनआय'ने द टाइम्स ऑफ इस्त्रायलचा हवाला देत दिले आहे. दरम्यान इस्त्रायलमध्ये प्रचंड तणाव असून, केंद्र सरकारने इस्त्रायलमधील भारतीय नागरिकांना सतर्क राहण्याचा सल्ला दिला आहे.

इस्त्रायलच्या आरोग्य मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, रॉकेट हल्यात जखमी झालेल्या ७७९ जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. 'टाईम्स ऑफ इस्त्रायल'ने दिलेल्या वृत्तानुसार, दहशतवादी



इस्त्रायल : इस्त्रायलवर रॉकेट हल्ले केल्यावर अनेक इमारती उधवस्त झाल्या आहेत.

संघटना हमासच्या दहशतवाद्यांनी देशाच्या दक्षिणेकडील अनेक भागात घुसखोरी केली आहे. तसेच पाच सैनिकांचे अपहरणही केले आहे.

हमासचा दहशतवादी कमांडर मोहम्मद देईफ याने इस्त्रायलवर जोरदार हल्याचा इशारा दिला आहे, असे वृत्त जेरुसलेम पोस्टने वृत्त दिले आहे. दरम्यान, अनेक जागतिक नेत्यांनी हमासच्या दहशतवाद्यांनी इस्त्रायलवर केलेल्या भ्याड हल्ल्याचा निषेध केला आहे.हमासच्या सैनिकांची घुसखोरी आणि गाझामधून क्षेपणास्त्र हल्ल्यांनंतर इस्त्रायलने देशात आधीच युद्ध स्थिती जाहीर केली आहे. इस्त्रायली सैन्य गाझा पट्टीच्या सीमेजवळील दक्षिण इस्त्रायलमधील वेगवेगळ्या ठिकाणी हमासच्या दहशतवाद्यांशी लढत आहे, ज्यात कफर अझा, सडेरोट, सुफा, नहल ओझ, मॅगेन, बेरी आणि रेइम लष्करी तळ या शहरांचा समावेश असल्याचेही 'द टाइम्स ऑफ इस्त्रायल'ने आपल्या वृत्तात नमूद केले आहे.

## तर बावनकुळेंना दारोदारी का फिरावे लागत आहे? : जयंत पाटील

**माणदेश एक्सप्रेस न्युज**



जयंत पाटील

**कोल्हापूर :** आमचे काही आमदार बाजूला गेले म्हणून जनाधार गेला असे समजण्याचे कारण नाही. अन्यथा चंद्रशेखर बावनकुळे यांना दारोदारी जाऊन आगामी पंतप्रधान कोण असे विचारण्याची वेळ आली नसती, असा टोला राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी शनिवारी येथे लगावला. राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरद पवार यांनी राहुल गांधी यांना बारामतीत आमंत्रित केल्याच्या मुद्द्यावरून भाजप प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी शरद पवार यांच्यावर टीका केली होती. राहुल गांधींना बारामतीत बोलावल्याने काही फरक पडणार नाही, शरद पवार यांच्या पक्षाचे अस्तित्व राहिले नाही, अशी टीका त्यांनी केली होती. यावर जयंत पाटील यांनी प्रत्युत्तर दिले आहे.

शरद पवार हे एकटेच बारामतीमध्ये सक्षम आहेत. शरद पवार यांच्या नेतृत्वामुळे गेली २५ वर्ष आम्हाला सत्तेत स्थान मिळाले होते. जवळपास १८ वर्षे पक्षातील सर्व प्रमुख हे मंत्री राहिले होते. पक्ष वादात शरद पवार यांची बाजू भक्कम असल्याने शंका घेण्याचे कारण नाही. दुसरी बाजू त्यांच्या मताप्रमाणे दावा करत असली तरी ती टिकणार नाही. आमदार गेले म्हणून पक्ष त्यांच्या मागून जात नाही, असे शिवसेनेच्या खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने भाष्य केले आहे. देशातील राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांनी प्रतिज्ञापत्रामध्ये शरद पवार यांनाच अध्यक्ष म्हणून मान्यता दिली आहे, असेही पाटील यावेळी म्हणाले.

महाविकास आघाडीच्या काळात विकेंद्रीत औषध खरेदी करण्याची व्यवस्था होती. पण विद्यमान सरकारच्या काळात संबंधित मंत्र्यांनी ते अधिकार स्वतःकडे घेतलेले आहेत. औषध खरेदीचे महत्त्वाचे निर्णय योग्य वेळेत झाले नसतील, औषधांचा तुटवडा संपूर्ण राज्याला जाणवला असेल. त्यामुळे मंत्रीचं याला जबाबदार आहेत, असे मंत्री तानाजी सावंत हेच म्हणत असतील तर निश्चित मंत्री त्यास जबाबदार असणार आहेत, अशी टीकाही जयंत पाटील यांनी केली.

## सांगली महानगरपालिकेत निविदा मॅनेजचा प्रयत्न

**माणदेश एक्सप्रेस न्युज**




**सांगली :** सांगली महापालिकेतील एनक्रॅममध्ये निविदा मॅनेज प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत आयुक्तांनी सहा अधिकार्यांसह १३ जणांवर कारवाईचा बडगा उगारला आहे. यामध्ये निविदा कारकूनसह सहा अभियंत्यांना नोटीसा बजावल्या आहेत, तर सहा कर्मचार्यांच्या तडकाफडकी बदल्या केल्या आहेत. सुमारे एक कोटी ३० लाखाची कामे मर्जीतील ठेकेदारांना देण्याचा प्रयत्न यामुळे अधिकारी व कर्मचार्यांच्या अंगलट आला आहे.

महापालिकेच्या आरोग्य विभागाकडील एनक्रॅम कामाचे तुकडे पाडून निविदा ठराविक ठेकेदारालाच मिळावी यासाठी प्रयत्न करण्यात आल्याचे उघड झाले. खुल्या पध्दतीने निविदा मागणी केली असती स्पर्धात्मक दर मिळून महापालिकेचा आर्थिक फायदा होणार होता. मात्र, अंदाजपत्रकातील दरकरारानुसार ठेकेदाराला काम देण्याचा हा प्रयत्न होता.

याबाबत नागरी कृती समितीचे सतीश साखळकर यांनी तक्रार देताच आयुक्त सुनील पवार यांनी तातडीने सदोष निविदा प्रक्रिया रद्द करीत ही कामे महा ई टेंडर द्वारे प्रसिध्द करण्याचा निर्णय घेतला. दोन लिफाफा पध्दतीने ही कामे मॅनेज करण्याचा हा प्रयत्न उधळला गेला आहे. या गैरप्रकाराची आयुक्तांनी गंभीर दखल घेत शहर अभियंता, नगर अभियंता, कनिष्ठ अभियंता, पर्यावरण अभियंता, निविदा कारकून आदींसह सात अधिकार्यांना कारवाई का करू नये याबाबत दोन दिवसात खुलासा करण्याची नोटीस बजावली आहे. तसेच या निविदा मॅनेज प्रक्रियेत सहभागी असलेल्या सहा कर्मचार्यांच्या तडकाफडकी बदल्या करण्यात आल्या आहेत.

Email - netra7676@gmail.com
डिजीटल जम्बो
नेत्रा कलर झेरॉक्स्
७/१२ उतारे, सर्व शासकीय फॉर्म, मराठी टायपिंग
धिरज, 9503 63 8686 दिपक, 9595 04 7676 गाळा नं. ११

# विक्रमांचा आणि धावांचा पाऊस

## दक्षिण आफ्रिकेचा १०२ धावांनी विजय : श्रीलंकेचा जोरदार प्रतिकार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नवी दिल्ली :** वर्ल्ड कपच्या इतिहासातील सर्वात मोठ्या धावसंख्येचा आणि अनेक विक्रमांना गवसणी घातलेल्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने श्रीलंकेचा १०२ धावांनी पराभव केला. क्रिकेट वर्ल्डकपच्या इतिहासातील सर्वात मोठी धावसंख्या रचली गेली. दक्षिण आफ्रिकेने श्रीलंकेची गोलंदाजी फोडून काढताना ४२८ धावांचा डोंगर उभा केला. सलामीवी क्विंटन डिकाक, वॅन डेर दुसेन आणि पाचव्या मारक्रम यांनी केलेल्या शतकी खेळीच्या जोरावर दक्षिण आफ्रिकेने ५० षटकात पाच बाद ४२८ धावांचा डोंगर उभा केला. मारक्रमने वर्ल्डकपच्या इतिहासातील सर्वात वेगवान शतकाची नोंद केली. त्याने ५४ चेंडूत १०६ धावा चोपल्या. त्यामुळे दक्षिण आफ्रिकेला ४२८ धावांचा डोंगर उभा करता आला. ४२८ धावांचे आव्हान घेऊन उतरलेल्या श्रीलंकेची सुरुवात अत्यंत निराशाजनक झाली. मात्र, श्रीलंकेच्या मधल्या फळीने केलेल्या कडव्या



नवी दिल्ली : श्रीलंकेवर विजय मिळविल्यानंतर आनंद व्यक्त करताना द.आफ्रिकेचे खेळाडू

प्रतिकारामुळे त्यांना ३२६ धावांपर्यंत मजल मारता आली. तिसऱ्या क्रमांकावर आपल्याला कुसल मेंडीसने अवघ्या २५ चेंडूत अर्धशतक ठोकत श्रीलंकेसाठी आशा निर्माण केली होती. मात्र, इतर फलंदाजाकडून अपेक्षित साथ मिळाली नाही. असलंकाने ७९ धावांची दमदार खेळी केली. शनाकाने ६८ धावांची खेळी केली. या तिघांव्यतिरिक्त इतर फलंदाजांना अपेक्षित खेळी उभा करता आली नाही. शेवटच्या टप्प्यात कसून रजथाने केलेल्या ३१ चेंडूतील ३३ धावांमुळे श्रीलंकेला सव्वा तीनशेपर्यंत मजल मारता आल्याने पराभवातील अंतर कमी झाले. श्रीलंकेकडून एक मोठी खेळी गेली असती तर सामन्याचे चित्र वेगळे दिसले असते. आफ्रिकेच्या तीन शतकांना तीन अर्धशतकांनी प्रत्युत्तर मिळाले. श्रीलंकेचे दोन्ही सलामीवर अपयशी ठरले.

## मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्रीही कंत्राटी पद्धतीने भरा : प्रकाश आंबेडकर

**माणदेश एक्सप्रेस न्युज**



प्रकाश आंबेडकर

**सातारा :** महाराष्ट्रात खासगीकरणाची सुरुवात झाली असून, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्यापेक्षा अधिक क्षमता व नैतिकता असणारी माणसे आहेत. आता मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री हेही कंत्राटी पद्धतीने भरायला सुरुवात करा, असा टोला लगावून ही कंत्राटी पद्धत बेकायदेशीर असून, हे सरकारही पूर्णपणे बेकायदा आहे, अशी जहरी टीका वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी राज्यातील सरकारवर केली.

वंचित बहुजन आघाडीचे नेते ड. प्रकाश आंबेडकर यांनी साताऱ्यात शासकीय विश्रामगृहात पत्रकारांशी संवाद साधला. या वेळी त्यांनी राज्य सरकारच्या भरती प्रक्रियेवर टीका केली. ते म्हणाले, महाराष्ट्रात खासगीकरणाची सुरुवात झाली असून, एकनाथ शिंदे, फडणवीस, पवार यांच्यापेक्षा अधिक क्षमता व नैतिकता असणारी अनेक माणसे आहेत.

आता मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री हेही कंत्राटी पद्धतीने भरायला सुरुवात करा. नोकर भरतीत चार हजारांवर पदे भरायची असून, टीसीआय कंपनीने अर्जासाठी एक हजार घेतले आहेत.या भरतीत टीसीआयला १२० कोटींचा नफा झाला आहे. ज्यांचे अर्ज बाद होतील, त्यांचे एक हजार रुपये ही कंपनी परत देणार का, हा प्रश्न आहे. मुळात नोकर भरती करण्याचा अधिकार हा पंतप्रधान आणि मुख्यमंत्र्यांनाही नाही. हा अधिकार लोकसेवा आयोगाला आहे. सरकारला कोणता आयोग ते ठरविण्याचा अधिकार आहे. निवडण्याचा नाही. हा अधिकारी राष्ट्रपती आणि राज्यपालांनाच आहे असे ते म्हणाले.

## आटपाडी तालुक्यातील ग्रामपंचायतीच्या निवडणुका होणार चुरशीने

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/धिरज प्रक्षाळे :** आटपाडी तालुक्यातील सतरा ग्रामपंचायतीच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झाला असून या निवडणुका चुरशीने होणार आहेत. आटपाडी तालुक्यात सध्या राजेंद्रआण्णा व अमरसिंह देशमुख यांचा भाजपचा गट, आमदार गोपीचंद पडळकर यांचा भाजपचा दुसरा गट, तर शिवसेना तानाजी पाटील यांचा शिवसेना गट तालुक्यात सक्रीय राजकारणात आहेत. तर काँग्रेसचे तालुकाध्यक्ष जयदीप भोसले यांचा गट पश्चिम भागात प्रबळ आहेत.



राजेंद्रआण्णा देशमुख



गोपीचंद पडळकर



तानाजी पाटील



जयदीप भोसले

नेलकरंजी, वाक्षेवाडी, काळेवाडी, मानेवाडी, मासाळवाडी, मिटकी, पिंपरी खुर्द, आंबेवाडी, बनपुरी, करगणी, मुढेवाडी, निंबवडे, पूजारवाडी आ., विभूतवाडी, औटेवाडी, कानकात्रेवाडी, चिंचाळे या गावाच्या ग्रामपंचायतीच्या निवडणुका होणार आहेत. यामध्ये नेलकरंजी, मानेवाडी, कानकात्रेवाडी या ग्रामपंचायतमध्ये जयदीप भोसले यांच्या काँग्रेसची सत्ता होती. वाक्षेवाडी, आंबेवाडी, मासाळवाडी, विभूतवाडी, बनपुरी, निंबवडे या ग्रामपंचायतीमध्ये भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर यांची सत्ता होती. तर मिटकी, मुढेवाडी, पिंपरी खुर्द, पूजारवाडी आ. या ग्रामपंचायतीमध्ये जिल्हा बँकेचे संचालक तानाजी पाटील यांच्या शिवसेना गटाची सत्ता होती.

परंतु तालुक्यामध्ये झालेल्या जिल्हा बँक निवडणूक व बाजार समिती निवडणुकीमध्ये बरेच उलटफेर निर्माण झाले आहे. शिवसेनेच्या तानाजी गटाबरोबर सध्या रासप व काँग्रेसची आघाडी असून, देशमुख गट व पडळकर गट सध्या तरी एकत्र आहेत. परंतु स्थानिक पातळीवर मात्र वेगवेगळी समीकरणे निर्माण होत असल्याने ऐन निवडणुकीमध्ये व निवडणुकीनंतर मात्र नेमकी कोणत्या गटाची सत्ता येणार हे समजणार आहे. परंतु सध्या तरी, तालुक्यामध्ये देशमुख गट, पडळकर गट, तानाजी पाटील गट, काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस असे गट असून मतदार कुणाच्या पारड्यात मत टाकतात यावरच पुढील विधानसभे मध्ये तालुक्यातून कोणाला लीड मिळणार हे अवलंबून असणार आहे.

भाऊ कन्स्ट्रक्शन
बिल्डर्स & डेव्हलपर्स
9004792356
- उत्कृष्ट,दर्जेदार आणि मजबूत पध्दतीचे कामे.
- सर्वांच्या पसंतीत आणि विश्वासात नं.१ चे स्थान असलेले.

## कांदे-टोमॅटो रस्त्यावर फेकून प्रश्न सुटणार नाही : अजित पवार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नाशिक :** 'कधी एकदम चांगला भाव मिळतो तर कधी एकदम रस्त्यावर फेकण्याची वेळ येते. मात्र काही वेळा डिमांड आणि सप्लाय या दोन गोष्टी महत्त्वाच्या ठरतात. पाऊस काळ कसा आहे, यावर भाव अवलंबून असतात. अशा पद्धतीने कांदे टोमॅटो रस्त्यावर फेकून प्रश्न सुटणार नाही. शेतकऱ्यांनी सबुरीने भूमिका घेणं आवश्यक आहे, असे मत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केले.

उपमुख्यमंत्री अजित पवार नाशिक दौऱ्यावर असताना कळवण येथे शेतकरी कृतज्ञता मेळाव्यात बोलत होते. अजित पवार पुढे म्हणाले, कांदा निर्यात शुल्कावरून शेतकऱ्यांमध्ये असंतोष आहे. हे निर्यात शुल्क काढून टाकले पाहिजे, याबाबत सबुरीने भूमिका घेणं आवश्यक आहे, अशी सर्वांची भावना आहे, कारण शेतकऱ्यांना त्यामुळेच दोन पैसे अधिकचे मिळतात. एखाद्या पिकाला चांगला भाव मिळाला की सर्व शेतकरी त्याच पिकाची लागवड करतात. परिणामी पिकाचा पुरवठा वाढला की भाव घसरतात. शेतमाल रस्त्यावर फेकल्याने घसरलेले भाव वाढणार नाहीत, हे जे काही ग्राहक आणि उत्पादक याचा जो ताळमेळ साधला गेला पाहिजे. तसेच सरकार तुमच्यासोबत आहे, शेतक-यांना आम्ही वाऱ्यावर सोडणार नाही असे आश्वासनही



अजित पवार

अजित पवार यांनी यावेळी दिले. सध्या टोमॅटोचे भाव कोसळले आहेत, दोन महिन्यांपूर्वी टोमॅटोला सर्वाधिक भाव होता. मध्यंतरी कांद्याचा प्रश्न मोठा बिकट झाला होता. व्यापाऱ्यांनी कांदा घेणे बंद केलं होतं. कधी एकदम चांगला भाव मिळतो तर कधी एकदम रस्त्यावर फेकण्याची वेळ येते. मात्र काही वेळा डिमांड आणि सप्लाय या दोन गोष्टी महत्त्वाच्या ठरतात. पाऊस काळ कसा आहे, यावर भाव अवलंबून असतात. धरणात किती पाणी आहे? नैसर्गिक संकट काही आले का? असे प्रश्न समोर येत असतात. त्यावर मार्ग काढणे आवश्यक आहे. या सगळ्यांवर भाव अवलंबून असतात. त्यामुळे अशा पद्धतीने कांदे टोमॅटो रस्त्यावर फेकून प्रश्न सुटणार नाही. त्याच्यात काही प्रक्रिया करणारी गोष्टी करता येतील का? दुसरा काही मार्ग काढता येईल? यावर चर्चा केली पाहिजे. त्यामुळे हे सरकार शेतकऱ्यांना कदापी वाऱ्यावर सोडणार नाही, जे जे राज्य सरकारला शेतकऱ्यांच्या निर्णय घ्यावे लागतील, तेथे निर्णय एकनाथ शिंदे आणि आम्ही सर्व मिळून घेऊ आणि जिथं केंद्रामध्ये नरेंद्र मोदी, अमित शहा यांच्यासह पियुष गोयल यांच्याकडे देखील पाठपुरावा करू, शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत आम्ही पाठपुरावा करण्यात कुठेही कमी पडणार नाही, असा विश्वास यावेळी अजित पवार यांनी दिला.

# संपादकिय

## भाजपकडून अजितदादांचा महत्त्व का?

आगामी लोकसभा निवडणुकीच्या दृष्टीने महाराष्ट्रातील ४८ जागा भाजपसाठी महत्त्वाच्या असल्याने भाजप अजित पवार यांच्या कलाने घेत आहे काय, असा प्रश्न सध्या निर्माण झाला आहे. प्रशासनावर उत्तम पकड तसेच जनसामान्यांशी थेट संपर्क ही अजित पवार यांची कार्यपद्धती आहे. लोकसभा निवडणुकीतच भाजपसाठी ते किती उपयुक्त हे सिद्ध होणार आहे. किती जागा ते निवडून आणतात हे महत्त्वाचे ठरणार आहे. सध्या तरी अजित पवार यांची ताकद ही झाकली मूठ आहे.

एकनाथ शिंदे हे हिंदुत्वाच्या विचारांशी निगडित आहेत. अजित पवार यांच्याशी आघाडी ही भाजपसाठी वैचारिक दृष्ट्या पूर्णपणे विरुद्ध आहे. केवळ २०२४ मध्ये तिसऱ्यांदा केंद्रातील सत्तेच्या मार्गात अडथळे येऊ नयेत यासाठी भाजपने अजितदादांना घेतले. राज्यात विक्रमी पाचव्यांदा ६४ वर्षीय अजित पवार हे उपमुख्यमंत्रीपद सांभाळत आहेत. मुख्यमंत्रीपदाची महत्त्वाकांक्षा त्यांनी लपवून ठेवली नाही. भाजपच्या अनेक पारंपरिक मतदारांना अजूनही अजित पवार यांच्याशी आघाडी करणे पचनी पडलेले नाही. पक्षाच्या जिल्हास्तरीय नेत्या-कार्यकर्त्यांनाही जुळवून घेणे अवघड आहे. पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाच्या निवडीत त्याचा प्रत्यय आला. जिल्ह्यातील नेत्यांचा विरोध असताना अजित पवारांनी हे पद मिळवले. अर्थ खात्यापाठोपाठ पालकमंत्रीपद या सगळ्या त्यांच्या मागण्या भाजपचे केंद्रातील नेते कसे मान्य करतात, असा प्रश्न पडतो.

अजित पवार यांना पुणे, सातारा तसेच कोल्हापूर या साखर पट्ट्यातील तीन जिल्ह्यांत त्यांना मानणारा मोठा वर्ग आहे. पुणे जिल्ह्याचे पालकमंत्रीपद तर त्यांनी प्रतिष्ठेचे केले होते. यात भाजपला चंद्रकांत पाटील यांच्यासारख्या माजी प्रदेशाध्यक्षाकडून हा जिल्हा काढून घ्यावा लागला. मूळचे कोल्हापूर जिल्ह्यातील चंद्रकांत पाटील हे भाजपच्या प्रमुख मराठा नेत्यांपैकी एक. मुंबईपाठोपाठ राज्यात संख्याबळाच्या दृष्टीने पुण्याचे महत्त्व आहे. जिल्ह्यात लोकसभेच्या चार जागा, विधानसभेच्या २० तसेच दोन मोठ्या महापालिका अशी व्याप्ती आहे. येथील राजकारणावर प्रभाव ठेवायचा असेल तर पालकमंत्रीपद महत्त्वाचे ठरते. निधीवाटप किंवा अन्य बाबींच्या दृष्टीने कार्यकर्त्यांना बळ देणे शक्य होते. पुणे जिल्ह्याच्या राजकारणाचा इतरत्रही प्रभाव पडतो. विशेषत: मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांवर येथील घडामोडींचा परिणाम होतो. यामुळेच पुण्याच्या पालकमंत्रीपदाचा मुद्दा महत्त्वाचा ठरला. अजित पवार किंवा त्यांच्या बरोबर आलेले राष्ट्रवादीतील नेते हे सातत्याने नरेंद्र मोदी यांनी पुन्हा पंतप्रधान व्हावे म्हणून आम्ही पाठिंबा दिला असे वक्तव्य करत आहेत. आता अजित पवार यांना भाजपसाठी त्यांचे महत्त्व लोकसभा निवडणुकीतील कामगिरीतून सिद्ध करावे लागेल.

# बांगलादेशचा अफगाणिस्तानवर ६ विकेट्सने दणदणीत विजय

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**धर्मशाला :** एकदिवसीय विश्वचषकाच्या तिसऱ्या सामन्यात बांगलादेशने अफगाणिस्तानचा ६ विकेट्सने पराभव केला. दोन्ही संघांमधील हा सामना धर्मशाला येथील हिमाचल प्रदेश क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर झाला. बांगलादेशचा कर्णधार शकीब अल हसनने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. अफगाणिस्तानचा संघ ३७.२ षटकात १५६ धावांवर सर्वबाद झाला. प्रत्युत्तरात बांगलादेशने ३४.४ षटकांत ४ गडी गमावत १५८ धावा करून सामना जिंकला.

बांगलादेशने अफगाणिस्तानला सहा गडी राखून पराभूत करून विश्वचषक मोहिमेची सुरुवात केली. या विजयासह त्याचे एका सामन्यात दोन गुण झाले



**धर्मशाला : बांग्लादेशच्या विजयामध्ये महत्त्वाची भूमिका बजावणारे नजमुल हुसेन शांतो व मेहदी हसन**

आहेत. ते पॉइंट टेबलमध्ये न्यूझीलंड आणि पाकिस्ताननंतर तिसऱ्या स्थानावर आहेत. तिन्ही संघांचे प्रत्येकी दोन गुण आहेत. उत्तम नेट रन रेटच्या आधारे न्यूझीलंड अव्वल स्थानी आहे.

सामन्यात अर्धशतक झळकावण्याबरोबरच तीन विकेट्स घेणाऱ्या मेहदी हसनची सामनावीर म्हणून निवड करण्यात आली.

बांगलादेशकडून नजमुल हुसेन शांतोने नाबाद ५९ धावा केल्या. त्याने ८३ चेंडूंच्या खेळीत तीन चौकार आणि एक षटकार लगावला. मेहदी हसन मिराजने ७३ चेंडूत ५७ धावांची खेळी केली. या दरम्याने त्याने पाच चौकार मारले. शाकिब अल हसन १४ धावा करून बाद झाला, तर लिटन दास १३ धावा करून बाद झाला. तनजीद हसनने पाच धावा केल्या. मुशफिकुर रहीम दोन धावा करून नाबाद राहिला.

अफगाणिस्तानकडून फजलहक फारुकी, अजमतुल्ला उमरझाई आणि नवीन उल हक यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

प्रारंभी अफगाणिस्तानकडून रहमानउल्ला गुरबाजने सर्वाधिक ४७ धावा केल्या. इब्राहिम झद्रान आणि अजमतुल्ला ओमराई यांनी प्रत्येकी २२ धावांची खेळी केली. रहमत शाह आणि कर्णधार हशमतुल्ला शाहिदीने प्रत्येकी १८ धावांचे योगदान दिले. राशिद खानला ९, मोहम्मद नबी ६ आणि नजीबुल्ला जद्रानला केवळ पाच ५ करता आल्या. मुजीब उर रहमानने एक धाव घेतली. नवीन उल हक खातेही उघडू शकला नाही. फजलहक फारुकी खाते न उघडता नाबाद राहिला.

बांगलादेशकडून शाकिब अल हसन आणि मेहदी हसन मिराज यांनी प्रत्येकी तीन विकेट्स घेतल्या. शरीफुल इस्लामला दोन विकेट्स मिळाल्या. मुस्तफिजुर रहमान आणि तस्किन अहमद यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

# नागपूर जिल्ह्यातील पिकाच्या नुकसानाची महसूलमंत्र्यांकडून पाहणी



**नागपूर :** सप्टेंबर महिन्यामध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे तसेच पिकांवर आलेल्या रोगामुळे नागपूर जिल्ह्यातील ग्रामीण भागात पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. या नुकसानाची प्रत्यक्ष बांधावर जाऊन महसूल, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आज पाहणी केली. परिस्थितीचा आढावा घेतला.

अकोला येथील आपला नियोजित कार्यक्रम आटपून त्यांनी दुपारी नागपूर जिल्ह्यातील कोंढाळी, काटोल, पावनवाडी, पारडसिंगा येथील नुकसानग्रस्त भागाचा दौरा केला.

नागपूर जिल्ह्यामध्ये सप्टेंबर महिन्यात ढगफुटीसदृश झालेल्या पावसामुळे मोठ्या प्रमाणात शेतीचे नुकसान झाले आहे. यापूर्वी मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील, कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी जिल्ह्याचा दौरा केला होता. आज महसूल मंत्र्यांनी ग्रामीण भागात जाऊन नुकसानाची पाहणी केली.

जिल्ह्यात प्रामुख्याने सोयाबीन पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. प्रत्येक ठिकाणच्या शेतकऱ्यांनी सोयाबीनवर आलेल्या 'पिवळ्या मोझॅक व्हायरस' या रोगामुळे झालेल्या नुकसानाची माहिती महसूल मंत्र्यांना दिली. कीड नियंत्रणासाठी योग्य ती उपाययोजना करण्याबाबत त्यांनी शेतकऱ्यांशी चर्चा केली.

जिल्ह्यात झालेल्या नुकसानीचे पंचनामे झाल्याची खात्री त्यांनी यावेळी केली. पंचनामे राहिले असतील तर पूर्ण केले जातील असेही त्यांनी सांगितले.

पावनवाडी येथील शेतकरी भगवान कमेरीया यांच्या शेतातील मोसंबी पीकाची पाहणी केली. संत्रा व मोसंबी पिकांच्या वाणांचे संशोधन करण्यात यावे, अशी सूचना त्यांनी यावेळी केली.

काटोल तालुक्यातील वडली येथील ढोक महाजन मठ येथे भेट देऊन परिसराची पाहणी केली. तसेच पारडसिंगा येथील अनुसया माता मंदिर येथे भेट देऊन दर्शन घेतले.

उद्या दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी दुपारी जिल्ह्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत नागपूर जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये जिल्ह्यातील नुकसानाचा आढावा ते घेणार आहेत.

## राज्यात किमान ५ मोठ्या शासकीय रुग्णालयांत लिव्हर व किडनी प्रत्यारोपणाची सुविधा सुरु करणार - मंत्री हसन मुश्रीफ




**कोल्हापूर :** शासकीय रुग्णालयात मोठमोठ्या शस्त्रक्रियेची सुविधा व प्रत्यारोपण व्यवस्था नाही. गोरगरिबांसाठी राज्यातील २७ पैकी महत्त्वाच्या ५ ठिकाणच्या जिल्हा रुग्णालयात येत्या तीन ते चार महिन्यात लिव्हर व किडनी प्रत्यारोपण सुविधा सुरू करणार असल्याचे राज्याचे वैद्यकीय शिक्षण व विशेष सहाय्य मंत्री तथा पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी अत्याळ, कोल्हापूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या भूमिपूजनप्रसंगी सांगितले.

नांदेडसारख्या दुर्दैवी घटना राज्यात पुन्हा होऊ नयेत म्हणून आरोग्य यंत्रणा बळकट करण्यासह त्या सुसज्ज करण्याचे कार्य शासनाने हाती घेतले आहे. शासकीय रुग्णालयांवर नेहमीच क्षमतेपेक्षा जास्त ताण असतो. त्यासाठी जिल्हा रुग्णालयाबरोबरच जर ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय अधिक बळकट केली तर मुख्यालयात असलेल्या जिल्हा रुग्णालयावरील ताण कमी होईल. यातून गरजूंना चांगल्या प्रकारची आरोग्य सेवा मिळेल असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. यावेळी उपसंचालक आरोग्य सेवा प्रेमचंद कांबळे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुप्रिया देशमुख, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. राजेश गायकवाड, तहसीलदार ऋषिकेश शेळके, गटविकास अधिकारी शरद मगर, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष सतीश पाटील व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अत्याळ येथे प्राथमिक आरोग्य केंद्र निर्माण होत असल्यामुळे नजीकच्या बेळगुंदी, इंचनाळ,कौलगे, हीरलगे, ऐनापुर, करंबळी व गिजवणे गावातील अंदाजे २६ ते २७ हजार नागरिकांना आरोग्याच्या सोयी सुविधा जवळच मिळणार आहेत.

यापूर्वी पालकमंत्री मुश्रीफ यांनी उपजिल्हा रुग्णालय गडहिंग्लज येथील बीपीएचयू या नवीन इमारतीच्या बांधकामाचे भूमिपूजन केले. पंधराव्या वित्त आयोगामधून गडहिंग्लज तालुक्याच्या ठिकाणी बीपीएचयू नवीन इमारत बांधकाम मंजूर आहे . या ठिकाणी इमारतीमध्ये होणाऱ्या अत्याधुनिक प्रयोगशाळेतील सुविधांचा लाभ आता तालुक्यातील मोठ्या लोकसंख्येला होणार आहे. विविध चाचण्यांसाठी आता नागरिकांना जिल्ह्याच्या ठिकाणी जावे लागणार नाही. ४० लक्ष रुपये तांत्रिक मान्यता असलेल्या या इमारतीमध्ये अत्याधुनिक प्रयोगशाळेबरोबरच तालुका आरोग्य अधिकारी यांचे प्रशस्त कार्यालय असणार आहे. या इमारतीचे भूमिपूजन पालकमंत्री हसन मुश्रीफ यांच्या हस्ते संपन्न झाले.

तत्पूर्वी पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी गडहिंग्लज नगरपरिषदेमध्ये विविध विकास कामांचा आढावा घेतला. त्यांनी विकास व सौंदर्यीकरण यावर भर देण्याच्या सूचना केल्या व त्या अनुषंगाने आवश्यक निधी देण्याचे आश्वासन दिले. यावेळी नगर परिषदांना दिलेल्या वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदानातून करावयाच्या कामांच्या सद्यस्थितीबाबत त्यांनी माहिती जाणून घेतली. मुश्रीफ यांनी मुख्याधिकारी व उपस्थित अधिकाऱ्यांना मंजूर कामांच्या निविदा प्रक्रिया तातडीने राबवण्याच्या सूचनाही दिल्या. या बैठकीला मुख्याधिकारी स्वरूप खारगे यांनी विविध कामांची माहिती सादर केली. प्रांत बाळासो वाघमोडे, तहसीलदार ऋषिकेश शेळके यांचेसह नगरपरिषदेचे माजी पदाधिकारी उपस्थित होते.















दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन- ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायक्षेत्र)

संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक
mandeshexpressatp@gmail.com
दैनिक
माणदेशी बुलंद आवाज...
माणदेश एक्सप्रेस






# सिक्कीममध्ये पुराचा तडाखा!

## १२०० घरे वाहून गेली : आतापर्यंत ४१ जणांचा मृत्यू

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सिक्कीम :** सिक्कीममध्ये अचानक आलेल्या पुरात आतापर्यंत ४१ जणांचा मृत्यू झाला आहे. सुमारे १२०० घरे वाहून गेली. तर १५ लष्करी जवानांसह १०३ जण बेपत्ता असून त्यांचा शोध सुरू आहे. या नैसर्गिक आपत्तीत सुमारे २५ हजार लोक बाधित झाले आहेत. अनेकांचे संसार वाहून गेले आहेत. हजारो नागरिकांचं स्थलांतर करण्यात आलं आहे. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, ढिगारा आणि चिखलात अडकलेल्या लोकांना वाचवण्यासाठी शोध आणि बचाव पथके कार्यरत आहेत.

मुख्यमंत्री पीएस तमांग यांनी प्रसारमाध्यमांना दिलेल्या माहितीनुसार, सिक्कीममध्ये आतापर्यंत १९ मृतदेह सापडले आहेत. याशिवाय पुरामुळे अनेक जण वाहून गेल्याने उत्तर बंगाल भागात जिल्ह्यांमध्ये २२ मृतदेह सापडल्याची माहिती अधिकाऱ्यांनी


सिक्कीममध्ये ढगफुटीने नद्यांना आलेला पुर, यामध्ये मोठ्या प्रमाणत नुकसान झाले.

दिली आहे. सध्या बचावलेल्या २६ जणांवर रुग्णालयात उपचार सुरु आहेत, तर सुमारे १५०० लोक मदत शिबिरात आहेत. पुरामुळे २५००० लोक बाधित झाले आहेत.

सिक्कीममधील पुराचा फटका भारतीय लष्कराच्या जवानांनाही बसला आहे. तीस्ता बॅरेजच्या खालच्या भागात बेपत्ता झालेल्या सैन्य दलातील सात जवानांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत, तर १५ सैनिकांचा अद्याप शोध सुरू आहे. सिंगतामजवळील बुरडांग येथे लष्कराकडून बचावकार्य राबवलं जात आहेत.

संरक्षण आणि गृह मंत्रालयाचे अधिकारी बचावकार्यामध्ये सहभागी असलेल्या अधिकाऱ्यांच्या सतत संपर्कात आहेत. राज्याच्या यंत्रणेशीही संपर्क सुरू आहे. पुरामुळे उद्ध्वस्त झालेल्या रस्त्यांची डागडुजी करुन रस्ते लवकरात लवकर खुले करण्यासाठीही प्रयत्न सुरू आहेत. लष्कर आणि इतर सुरक्षा दलांच्या माध्यमातून बाधित भागात मदत साहित्य पोहोचवलं जात आहे.

सिक्कीममध्ये ढगफुटीमुळे तिस्ता नदीला आलेल्या पुरामुळे मृतांची संख्या १९ वर पोहोचली आहे. सिक्कीममधील या पुरात २२ लष्करी जवानांसह १०३ लोक बेपत्ता असल्याचे सांगण्यात येत आहे. बेपत्ता झालेल्या २३ जवानांपैकी फक्त एक सैनिकच सापडला आहे. बेपत्ता लोकांच्या शोधासाठी लष्कर आणि एनडीआरएफची टीम वाढवण्यात आली आहे. हेलिकॉप्टर आणि ड्रोनचीही मदत घेतली जात आहे. गुवाहाटी आणि पाटणा येथून आणखी टीम पाठवण्यात येत आहेत. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्याचे मुख्यमंत्री प्रेमसिंग तवांग यांच्याशी फोनवर चर्चा केली आहे. सर्व प्रकारच्या मदतीचे आश्वासन दिलं आहे.

# मा. आम. विजयराज शिंदे यांच्या वाहनाचा अपघात

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**बुलढाणा :** बुलढाणा विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार तथा भाजपा नेते विजयराज शिंदे यांच्या वाहनाला भरधाव एसटी बसने धडक दिली. यामुळे त्यांच्यासह सुमारे सहाजण जखमी झाले. एअर बॅग लगेच उघडल्याने अपघाताची तीव्रता कमी झाली. अकोला ते अमरावती दरम्यान आज दुपारी ही दुर्घटना घडली. जखमींवर अकोला येथे उपचार सुरू आहे.


बुलढाणा : माजी आम. विजयराज शिंदे यांची अपघातग्रस्त गाडी

विजयराज शिंदे यांनी अकोल्यात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. यानंतर खासदार अनिल बोंडे यांच्या भेटीसाठी अमरावतीकडे निघाले. अकोला सीमेवर कारंजा येथून अकोल्याकडे जाणाऱ्या एसटी बसने त्यांच्या वाहनाला धडक दिली. या अपघातामध्ये विजयराज शिंदे हे जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरु असून सुदैवाने यामध्ये कोणतीही जीवितहानी झाली नाही.

# देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रात नेतृत्व करावे : संजय शिरसाट

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** अजित पवार हे पुढचे मुख्यमंत्री झाले पाहिजे असे राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजितदादा गटाचे नेते म्हणत असतानाच आता, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी मात्र देवेंद्र फडणवीस यांनीच मुख्यमंत्री व्हावे ही कार्यकर्त्यांची इच्छा असल्याचं म्हटलं आहे. त्यामुळे महायुतीत मुख्यमंत्रीपदावरून रस्सीखेच सुरू असल्याचं चित्र निर्माण झालं आहे. आता शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट यांनीही मोठं विधान केलं आहे. त्यामुळे सर्वांच्या भुवया उंचावल्या आहेत.


मुख्यमंत्रीपदा बाबतची काही लोकं बॅनर लावतात. यावर अजितदादांनी स्पष्ट केले. देवेंद्र फडणवीस यांनीही स्पष्ट केले. मीही सांगतो की, ते बॅनर लावतात त्यात काही गैर नाही. जे बॅनर लावतात त्यांना शुभेच्छा आहे. पण माझीही इच्छा आहे की, एकनाथ शिंदेच मुख्यमंत्री राहावेत. आणि देवेंद्र फडणवीस इतकं चांगलं काम करत आहेत. त्यांनी केंद्रात नेतृत्व करावं. कॅपेसिटीचा जो भाग आहे ना तो फडणवीस यांच्याकडे आहे. म्हणून आम्हालाही वाटतं त्यांनी तेही नेतृत्व केलं पाहिजे, असा सल्ला संजय शिरसाट यांनी दिला आहे.

# 'तुम्ही जर संस्थापक अध्यक्ष तर मी राष्ट्रवादीचा पहिला प्रदेशाध्यक्ष' : छगन भुजबळ

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नाशिक :** ज्यावेळी शरद पवार बाहेर पडले. त्यावेळेला शरद पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली. त्यावेळी उजवा हात म्हणून मी काम पाहिले. शरद पवार सांगतात की मी राष्ट्रवादी पक्षाचा संस्थापक अध्यक्ष आहे, मग पवार साहेब मला तुम्हाला विचारायचं आहे कि, मी सुद्धा या महाराष्ट्राचा पहिला राष्ट्रवादीचा प्रांताध्यक्ष आहे, आमचाही पक्ष बांधणीत खारीचा वाटा आहे, असे प्रत्युत्तर मंत्री छगन भुजबळ यांनी दिले आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार हे नाशिक दौऱ्यावर आहेत. याचवेळी कळवणला शेतकरी मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी छगन भुजबळ बोलत होते. गेल्या दोन दिवसांपासून राष्ट्रवादी पक्षाच्या चिन्हांवरून वाद सुरु असून


छगन भुजबळ

निवडणूक आयोगाकडे सुनावणी सुरु आहे. या पार्श्वभूमीवर थेट शरद पवार निवडणूक आयोगाकडे तहान मांडून होते. यावर छगन भुजबळ यांनी निशाणा साधला आहे. पवार साहेब म्हणाले होते की मी काही कोर्ट कचेरी करणार नाही. पण आता कालपासून बघतो आहे, स्वतः पवार साहेबच तिकडे इलेक्शन कमिशनच्या ऑफिसमध्ये गेले. ते सांगतात की राष्ट्रवादी पक्षाचा मी संस्थापक अध्यक्ष आहे, मग पवार साहेब मला तुम्हाला विचारायचं आहे कि, मी संस्थापक प्रांताध्यक्ष आहे की नाही? ज्यावेळी शरद पवार काँग्रेसच्या बाहेर पडले. त्यावेळेला शरद पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली. त्यावेळी उजवा हात म्हणून मी काम पाहिले, असेही भुजबळ म्हणाले.

# सहाय्यक पोलीस निरीक्षकाची आत्महत्या

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सोलापूर :** येथे सहाय्यक पोलीस निरीक्षकानं स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. आनंद मळाळे असे आत्महत्या केलेल्या सहाय्यक पोलीस निरीक्षकाचे नाव आहे. आनंद मळाळे यांनी आत्महत्या का केली? याचं कारण अद्याप अस्पष्ट आहे. मात्र कामाचा ताण असल्यामुळे त्यांनी टोकाचं पाऊल उचलल्याचं बोललं जात आहे.

आज (शनिवारी) पहाटे चारच्या सुमारास ते घराबाहेरील अंगणात गेले. यावेळी आपल्या सर्विस रिवाल्वरमधून डोक्यात गोळी झाडून त्यांनी स्वतःचं आयुष्य संपवलं. घटनेच्यावेळी त्यांच्या पत्नी या घरातच होत्या. बाहेर येऊन त्यांनी पहिल्यानंतर आनंद मळाळे हे रक्ताच्या थारोळ्यात पडले होते. घटनेची माहिती मिळताच सोलापूरचे पोलीस उपायुक्त विजय कबाडे, सहायक पोलीस आयुक्त राजू


मयत आनंद मळाळे

मोरे आणि इतर अधिकाऱ्यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. तसेच मृतदेह शवविच्छेदनासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात रवाना करण्यात आले.

मूळचे धाराशिव जिल्ह्यातील आनंद मळाळे हे सोलापूर शहर पोलीस आयुक्तालयमध्ये अनेक वर्ष पोलीस कॉन्स्टेबल म्हणून कार्यरत होते. परीक्षा देऊन ते पोलीस उपनिरीक्षक झाले. त्यांनी सोलापूर शहर वाहतूक शाखा तसेच, सदर बाजार पोलीस ठाणे या ठिकाणी सेवा बजावली. त्यानंतर पुणे येथे पोलीस उपनिरीक्षक म्हणून सेवा बजावल्यानंतर सहाय्यक पोलीस निरीक्षक म्हणून नांदेड येथे त्यांची पदोन्नती झाली होती. मृत आनंद मळाळे यांच्या मागे पत्नी, मुलगा असा परिवार आहे. या घटनेची नोंद सदर बाजार पोलिस ठाण्यात झाली असून अधिक तपास सुरू आहे. मळाळे यांच्या मृत्यूची बातमी कळताच सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.





# गोरेंच्या निष्क्रीयतेमुळेच माण-खटावच्या नशिबी दुष्काळ : प्रभाकर देशमुख

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**दहिवडी :** माण-खटाव मतदारसंघासाठी १७.४७ टीएमसी एवढ्या पाण्याचे आरक्षण आज अखेर मंजूर आहे. त्यापैकी २००९ पूर्वी १२.६२ टीएमसी पाणी आरक्षित असून, गेल्या १४ वर्षांत त्यातील पस्तीस टक्केच पाणी प्रत्यक्ष उपलब्ध झाले आहे. त्यामुळे जलनायक म्हणून स्वतःचीच पाठ थोपटून घेण्यात धन्यता मानणाऱ्यांच्या निष्क्रीयतेमुळेच माण-खटावच्या नशिबी अजूनही दुष्काळ आहे, असा टोला राष्ट्रवादीचे नेते प्रभाकर देशमुख यांनी आमदार जयकुमार गोरे यांना लगावला.

दहिवडी येथे संपर्क कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत प्रभाकर देशमुख बोलत होते. ते म्हणाले, माण-खटावसाठी उरमोडी प्रकल्पांतर्गत ७.४२ टीएमसी, तर तारळी प्रकल्पांतर्गत ३.३८ टीएमसी पाणी आरक्षित करण्यात आलेले आहे. उरमोडीमधून २७७५० हेक्टर क्षेत्रापैकी प्रत्यक्षात


प्रभाकर देशमुख

९५०० हेक्टर क्षेत्राला पाणी उपलब्ध होत आहे.

तारळीचे पाणी आजही आरफळ कालव्यात येत नसल्याने कण्हेरमधून मंजूर पाण्याच्या ५० टक्केच पाणी उपलब्ध होत आहे. जिहे-कटापूर प्रकल्पांतर्गत १९९७ मध्ये माणसाठी १.८२ टीएमसी पाणी आरक्षित केले होते. हे पाणी पावसाळ्यात आंधळी धरणातून माणगंगा नदीपात्रात सोडणे अपेक्षित होते. त्यानंतर पाणी उचलून नेण्याच्या प्रकल्पास महाविकास आघाडी सरकारने सुधारित प्रकल्पास मंजुरी दिली.

टेंडर काढण्याच्या अंतिम टप्प्यात असलेल्या या कामास नवीन आलेल्या सरकारने स्थगिती दिल्याने हे काम वर्षभर होऊ शकले नाही. गेल्या वर्षभरापासून बोगद्याचे फक्त पाच मीटरचे काम अपूर्ण असून, ते पंधरा दिवसांत पूर्ण होऊ शकते, असे अधिकाऱ्यांचे मत आहे. हे काम पूर्ण न झाल्याने जिहे-कटापूरचे पाणी आंधळी धरणात येवू शकलेले नाही असे म्हणाले.









# महादेव ॲप प्रकरणी बॉलिवूड रडारवर

## कुरेशी प्रोडक्शन हाऊसवर ईडीचा छापा : मुंबईत ५ ठिकाणी छापेमारी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** महादेव ॲप प्रकरणी ईडीनं एका बॉलिवूड प्रोडक्शन हाऊसवर छापा टाकला आहे. कुरेशी प्रोडक्शनच्या माध्यमातून पैशांचा व्यवहार झाल्याचा आरोप ईडीकडून करण्यात आला आहे. दरम्यान, महादेव बुक ॲप प्रकरणी ईडीने शुक्रवारी कुरेशी प्रॉडक्शनसह आसपासच्या इतर पाच ठिकाणी छापे टाकले आहेत.

महादेव बेटिंग ॲप प्रकरणी अनेक बॉलिवूड कलाकार आता ईडीच्या रडारवर आहेत. ईडीच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, कुरेशी प्रोडक्शनला चित्रपट बनवण्यासाठी महादेव ॲपचे प्रवर्तक सौरभ चंद्राकर आणि रवी उप्पल यांच्याकडून आर्थिक मदत मिळाली होती.




कुरेशी प्रोडक्शन्स एका टॉप बॉलिवूड स्टारला घेऊन बिग बजेट ऐतिहासिक चित्रपट बनवत आहेत. हा चित्रपट प्रादेशिक भाषेत बनवला जात असून तो इतर अनेक भाषांमध्ये डब करण्यात येणार असल्याचंही सांगण्यात येत आहे. अंधेरी आणि इतर काही ठिकाणी छापेमारी अजूनही सुरू आहेत. वसीम कुरेशी आणि तबस्सुम कुरेशी हे प्रोडक्शन हाऊस चालवतात. वसीम कुरेशीची चौकशी केली सुरू आहे, त्याच्या प्रवासाचे सर्व तपशील तपासले जात आहेत आणि आर्थिक तपशीलांबाबतही ईडीकडून माहिती घेतली जात आहे.

गेल्या वर्षी १८ सप्टेंबर रोजी युएई मध्ये झालेल्या वाढदिवसाच्या सेलिब्रेशन आणि सक्सेस पार्टीमध्ये सहभागी झालेल्या कलाकारांची नावे आता समोर आली आहेत. एक युट्युब इन्फ्लुएंसर जो या पार्टीत सहभागी झाला होता, त्यानं आपल्या स्वतःचा युट्युब अकाऊटवरून एक व्हिडीओ साधारणतः एक वर्षापूर्वी प्रसारित केला होता. त्या व्हिडीओचं आता विश्लेषण केले जाणार आहे आणि अनेक बॉलिवूड कलाकार पार्टीत सहभागी झाल्याचं त्या व्हिडीओमधून दिसून येत आहे. व्हिडीओमध्ये जे जे बॉलिवूड स्टार्स दिसत आहेत, ते सर्व आता ईडीच्या रडारावर आहेत. सक्सेस पार्टीचे अनेक व्हिडीओ काही दिवसांत समोर आले आहेत. ज्यामध्ये सौरव चंद्राकार यांच्या लग्नापासून तर बर्थडे पार्टी आणि सक्सेस पार्टीमध्ये अनेक कलाकार सहभागी झाले होते. त्यांना त्यासाठी पैसेसुद्धा मिळाले होते, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. सौरभ चंद्राकर या मुख्य आरोपीनं आपल्या लग्नासाठी २०० कोटी रुपये तर बर्थडे आणि सक्सेस पार्टीसाठी ६० कोटी रुपये खर्च केल्याचा तपासात समोर येत आहे.

# भारत आणि ऑस्ट्रेलिया आज लढत

**चेन्नई :** आज भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यामध्ये महामुकाबला रंगणार आहे. चेन्नईच्या मैदानावर दोन्ही संघामध्ये आमनासामना होणार आहे. दुपारी दोन वाजता लढतीला सुरुवात होणार आहे. त्याआधी नाणेफेक होईल. विश्वचषक विजयाच्या दावेदार असणाऱ्या दोन संघातील लढतीकडे सर्व क्रीडा चाहत्यांच्या नजरा खिळल्या आहेत. हा सामना सर्वांना मोफत पाहता येणार आहे.




भारत-ऑस्ट्रेलिया यांच्यात होणारा सामना चेन्नईच्या एम ए चिदंबरम स्टेडियममध्ये होणार आहे. भारतीय वेळेनुसार, दुपारी दोन वाजता सामन्याला सुरुवात होईल. त्याआधी अर्धातास नाणेफेक होईल. टिव्हीवर स्टार स्पोर्ट्स चॅनलवर सामना पाहता येईल. स्टार स्पोर्ट्स १, स्टार स्पोर्ट्स एचडी, स्टार स्पोर्ट्स हिंदी सह इतर भाषांमध्येही सामन्याचा आनंद घेता येईल.

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यामध्ये होणारा शानदार सामना मोबईलवरही लाईव्ह पाहता येईल. डिज्नी प्लस हॉटस्टार ॲपवर हा सामना मोफत पाहता येईल.

टीम इंडिया आणि ऑस्ट्रेलिया यांच्यामध्ये भारतामध्ये आतापर्यंत ७० सामने झाले आहेत. यामध्ये भारताने ३२ सामने जिंकले आहेत, तर ऑस्ट्रेलियाने ३३ सामन्यात विजय मिळवला आहे. पाच सामन्याचा निकाल लागला नाही. भारतामध्ये ऑस्ट्रेलियाचे पारडे जड दिसत आहे.

ऑस्ट्रेलियामध्ये टीम इंडिया आणि कांगारु यांच्यामध्ये आतापर्यंत ५४ सामने झाले आहेत, त्यामध्ये भारतीय संघाला फक्त १४ सामन्यात विजय मिळला आहे, तर ऑस्ट्रेलियाने ३८ सामन्यात बाजी मारली आहे. दोन सामन्याचा कोणताही निकाल लागला नाही. मायभूमीतही ऑस्ट्रेलियाचे पारडे जड दिसत आहे.

# सिंदूर येथील तरुणाच्या खूनप्रकरणी तिघांवर गुन्हा दाखल

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**जत :** जत तालुक्यातील सिंदूर येथील युवकाचा खून पूर्ववैमनस्यातून झाल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. याप्रकरणी कल्लाप्पा मुरगप्पा देसारट्टी (वय ४०) शंकर मुरगप्पा देसारट्टी (वय ४२) या दोघांवर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत मृत संगाप्पाचा भाऊ सदाशिव पराप्पा मगदूम यांनी जत पोलिसांत फिर्याद दिली आहे.

मृत संगाप्पा पराप्पा मगदूम (वय ३३) यांच्या खून प्रकरणातील संशयित तिघेही आरोपी फरार आहे. आरोपींच्या शोधासाठी जत पोलीस ठाण्याचे दोन पथके रवाना झाली आहेत. यातील एक पथक कर्नाटक तसेच दुसरे पथक संशयित आरोपीच्या नातेवाईक यांच्याकडे कसून चौकशी करत आहे. या घटनेचा तपास पोलीस उपनिरीक्षक राजश्री गायकवाड करत आहेत.


मयत संगाप्पा मगदूम

याबाबत अधिक माहिती अशी, मृत संगाप्पा यांने शेजारीच असलेल्या देसारट्टी कुटुंबातील कल्लाप्पा व त्यांची पत्नी यांना गतवर्षी मारहाण केली होती. याच प्रकरणातून जत पोलिसांत सांगाप्पावर गुन्हा दाखल झाला होता. याच गोष्टीचा देसारट्टी कुटुंबीयांनी राग मनात धरला होता. परंतु, काही मध्यस्थीने यावर तोडगा काढला होता. परंतु, संगाप्पाला मारहाण झाल्याने पोलिसांत तक्रार देण्यासाठी व दवाखान्यात उपचारासाठी जात होता. दरम्यान आरोपी कलाप्पा व त्यांचा भाऊ शंकर, व घरातीलच एका व्यक्तीच्या मदतीने बसर्गी व सिंदूर रस्त्यावर त्याला अडवले. तिघांनी दगडाने हल्ला केला. यात संगाप्पा यांच्या डोक्यातून मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाला. उपचारासाठी त्यांना सांगली येथे नेत असताना वाटेतच मृत्यू झाला होता. या घटनेचा अधिक तपास जत पोलीस करत आहे.

# शरद पवार यांच्याकडे पक्ष राहिलेला नाही : चंद्रशेखर बावनकुळे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**कोल्हापूर :** नागरिकांची पसंती ही नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखालील भाजपला आहे. ही स्थिती पाहता आता तर शरद पवार यांच्याकडे पक्ष राहिलेला नाही, अशी टीका भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार यांच्यावर केली आहे.

जनमत हे भाजपकडे झुकत चालले आहे. लोकसभा निवडणूक जवळ येईल तशी त्यामध्ये वाढ होत जाईल. समाज माध्यमात विरोधक जाणीवपूर्वक भाजप विरोधात वातावरण निर्माण करत आहेत. पण त्याची आम्हाला फिकीर नाही, असेही बावनकुळे म्हणाले. भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांनी अजित पवार पुढे


कोल्हापुर : येथे पत्रकार परिषदेमध्ये बोलताना चंद्रशेखर बावनकुळे व उपस्थित खास. धनंजय महाडिक व मान्यवर

मुख्यमंत्री होतील, असे म्हटले असले तरी त्याची मला अचूक कल्पना नाही. पण प्रत्येक पक्षाच्या कार्यकर्त्यांना आपला नेता मुख्यमंत्री व्हावा असे वाटते. भाजपच्या कार्यकर्त्यांना देवेंद्र फडणवीस हेच पुन्हा मुख्यमंत्री व्हावे असे वाटते. तथापि आमच्या केंद्रीय समितीने सांगितले तर पुढेही एकनाथ शिंदे हेच मुख्यमंत्री राहतील, असेही बावनकुळे यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नेतृत्व मान्य असल्याचे अजित पवार यांनी जाहीरपणे सांगितले आहे. त्यांनी दिलेले समर्थन महत्त्वाचे असल्याने अजित पवार आमच्या सोबत आले आहेत, असा खुलासाही बावनकुळे यांनी केला. वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्यावरील ईडी कारवाई कुठपर्यंत आली हे माहित नाही. पण ती मागे घेतलेली नाही, असेही बावनकुळे यांनी सांगितले. यावेळी खासदार धनंजय महाडिक, केशव उपाध्ये, विजय जाधव, समरजित घाटगे, अमल महाडिक उपस्थित होते.

# कामगार भजन स्पर्धेत पुरुष गटात कुंडल केंद्र

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वतीने आयोजित गटस्तरीय कामगार पुरुष व खुली महिला भजन स्पर्धेत पुरुष गटात कामगार कल्याण केंद्र कुंडल तर महिला गटात इस्लामपूर केंद्राने प्रथम क्रमांक पटकावला आहे. भजन स्पर्धेतील विजेत्यांना आमदार सुधीर गाडगीळ यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. वसंतदादा औद्योगिक वसाहत येथील ललित कला भवन येथे झालेल्या या पारितोषिक वितरण कार्यक्रमास विभागीय कार्यालय पुणेचे सहाय्यक कल्याण अधिकारी मनोज पाटील, प्रभारी कामगार कल्याण अधिकारी संभाजी पवार, कोल्हापूरचे कामगार कल्याण अधिकारी विजय शिंगाडे,


सांगली : कामगार भजन स्पर्धेत विजेत्यांना पुरस्कार देताना आम. सुधीर गाडगीळ व उपस्थित मान्यवर

वसंतदादा औद्योगिक सह. सोसायटीचे चेअरमन सचिन पाटील, कृष्णा व्हॅली चेंबर ऑफ इंडस्ट्रीज कुपवाडचे अध्यक्ष सतीश मालू, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे उपाध्यक्ष रमेश आरवाडे, वसंतदादा औद्योगिक वसाहतीचे संचालक शिवानंद कबाडे, अशोक इरळे, कामगार भूषण व पंच रामकृष्ण चितळे आदि उपस्थित होते.

या वर्षी सांगली गटांतर्गत या भजन स्पर्धेसाठी संघ मंडळाच्या केंद्रांचे निमंत्रित संघ होते. यामध्ये सांगली, सातारा, कराड, इस्लामपूर, मांजर्डे, माडगुळे, कुंडल आदी संघांनी सहभाग घेतला. पुरुष गटात कामगार कल्याण केंद्र कुंडल- प्रथम, कामगार कल्याण केंद्र- इस्लामपूर- द्वितीय आणि कामगार कल्याण केंद्र, कराड यांनी तृतीय क्रमांक पटकावला तर महिला गटात कामगार कल्याण केंद्र इस्लामपूर- प्रथम, कामगार कल्याण केंद्र, माडगुळे- द्वितीय आणि कामगार कल्याण केंद्र तासगाव केंद्राने तृतीय क्रमांक पटकावला आहे. कार्यक्रमाचे निवेदन कल्याण निरिक्षक राजेंद्र निकम यांनी केले.

माणदेश एक्सप्रेस
व्यवसायिक जाहिरात योजना
आपल्या व्यवसायाचा प्रचार, प्रसार करण्यासाठी दैनिक 'माणदेश एक्सप्रेस' ने आणली आहे अल्प दरात जाहिरात योजना आहे.
आटपाडी तालुक्यासह सांगली तसेच माणदेशातील अग्रगण्य दैनिक माणदेश एक्सप्रेस च्या माध्यमातुन आपली जाहिरात ५० हजार लोकपर्यंत पोहचवा.
10 X 5 cm ९०००/- रुपयात महिनाभर
10 X 10 cm २०००/- रुपयात महिनाभर
20 X 7 cm ३०००/- रुपयात महिनाभर
20 X 13 cm ४०००/- रुपयात महिनाभर
टीप : आतील पानासाठी हे दर १० टक्के कमी आहेत
याशिवाय विशेष स्किम, विविध योजांची माहिती देणाऱ्या बातम्यांना प्रसिद्धी दिली जाईल.
आजच संपर्क करा
९५९५०४७६७६, ९५०३६३८६८६







